# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक






vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 15 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 260 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# बारामतीत ५ महिन्यांत १ लाख मताधिक्याने जिंकलो : मग मी गडबड केली का?

## 'मत चोरी'वर अजित पवारांचा विरोधकांना सवाल

मुंबई (वृत्तसंस्था)–नवी दिल्लीत 'इंडिया' आघाडीने निवडणूक आयोगाच्या विरोधात काढलेल्या मोर्चावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सडकून टीका केली आहे. विरोधकांकडे आता कोणतेही मुद्दे राहिलेले नाहीत, म्हणूनच ते ईव्हीएम नंतर आता मतदारयाद्यांवरून आरोप करत आहेत, असे अजित पवार म्हणाले. तसेच त्यांनी बारामती मतदारसंघाचे उदाहरण देत, विरोधकांना पराभव दिलदारपणे स्वीकारण्याचा सल्ला दिला. शिवाय विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने भूमिका स्पष्ट करावी, असेही ते म्हणालेत.अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात आमच्या उमेदवाराला ४८ हजार मते कमी पडली. पण, पाच महिन्यांनंतर विधानसभा निवडणुकीत त्याच मतदारांनी मला एक लाखांपेक्षा जास्त मताधिक्याने निवडून दिले. म्हणजे मी तिकडे काही गडबड केली असा अर्थ होतो का? असा सवाल केला. लोकसभा निवडणुकीला वर्ष उलटले, विधानसभा निवडणूक होऊन नऊ महिने झाले, विरोधकांनी दिलदारपणे पराभव स्वीकारला पाहिजे, असा सल्ला अजित पवार यांनी विरोधकांना दिला.

### निवडणूक आयोग चुकत असल्यास न्यायालय आहे

मी बारामतीतून सलग निवडणूका जिंकलो आहे. त्यात कधी असे काही घडले नाही. लोकांची कामे केली तर लोक आपल्या पाठीशी ठामपणे उभी राहतात, हा आमचा अनुभव असून लोकांच्या अडीअडचणी सोडवा. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हा, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. पराभव झाल्यानंतर विरोधक निवडणूक आयोगाला दोष देतात आणि जिंकले तर उदोउदो करतात. निवडणूक आयोग चुकत असेल तर न्यायव्यवस्था आहे ना. राजकीय पक्षांना आपला मुद्दा मांडण्याचा अधिकार असतो, पण आयोगाला बदनाम करणे योग्य नाही. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत अभूतपूर्व यश मिळवले, तेव्हा आयोग योग्य काम करत होता, पण आता त्यांचा दारुण पराभव झाला आहे, तेव्हा आयोगावर आरोप होत आहेत, असे अजित पवार यांनी म्हटले.



### निवडणूक आयोगानेही भूमिका स्पष्ट करावी

अजित पवार यांनी होणाऱ्या आरोपांवर निवडणूक आयोगांनी भूमिका स्पष्ट करावी, असे म्हटले आहे. देशात काही मोजक्या संस्थांना संविधानाने स्वायत्तता दिली आहे. निवडणूक आयोग त्यापैकीच एक आहे. त्यामुळे विरोधकांकडून आयोगावर होत असलेल्या आरोपांत तथ्य आहे की नाही हे त्यांनी स्पष्ट करणे गरजेचे असल्याचे अजित पवार म्हणाले. एका पत्त्यावर अनेक मतदार राहात असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. ही बाब आयोगाने पडताळून पाहायला हवी. तसे नसेल तर ते स्पष्ट केले पाहिजे, पण चूक असेल तर तसेही आयोगाने सांगितले पाहिजे. आयोगाच्या कामात कुणीही हस्तक्षेप करू शकत नाही. ज्यांचा अधिकार आहे त्यांनी उत्तर द्यायला हवे. लोकशाहीत विविध पक्ष आपले मत मांडू शकतात म्हणजे आम्ही आयोगाची बाजू घेतो असे नाही, असेही अजित पवार म्हणाले.

# पंचशील नगर भागात घाणीचे साम्राज्य,कचरा डेपोचे आले स्वरूप

## रोगराई पसरण्या अगोदर उपाययोजना करण्याची आवश्यकता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पंचशील नगर भागामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले पहावयास मिळत आहे या घाणीच्या साम्राज्याने कचरा डेपोचे स्वरूप घेतल्याचेही दिसून येत आहे. या घाणीमुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता वाढल्या असून लवकरात लवकर उपाय योजना करायला हव्यात या भागांमध्ये चार ते पाच शाळा असून शाळेचे विद्यार्थी रस्त्याने ये जा करतात नगरपरिषदे याकडे दुर्लक्ष केले असून भागामध्ये कसल्याही प्रकारची कचराकुंडी ठेवल्याची बघायला



मिळत नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस असून हा कचरा पावसामध्ये भिजल्यामुळे दुर्गंधीही पसरलेली आहे. अक्षरशा या रस्त्याने जाताना नाकाला रुमाल बांधूनच जावा लागत आहे. लवकरात लवकर या ठिकाणी एखादी कचराकुंडी ठेवून नगरपालिकेने नागरिकांच्या आरोग्याची दखल घ्यावी अशी मागणी होताना पहावयास मिळत आहे.

# गौरव जगतकर यांची एम.बी.बी.एस साठी निवड झाल्याबद्दल सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

गौरव विनोद जगतकर वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी पहिल्या फेरीत अहिल्यानगर (अहमदनगर) येथील सुप्रसिद्ध डॉ.विठ्ठलराव विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे निवड झाली आहे. गौरवच्या या अतिउच्च यशाचा अभिमान आहे. याप्रसंगी शुभेच्छा देताना पत्रकार बालाजी जगतकर,अशोक रोडे, तारा अशोक रोडे, देविदास जंगले,प्रा.डॉ.विनोद जगतकर, मनीषा जगतकर, प्रताप समिंदर सावळे, राज जगतकर, रावसाहेब जगतकर, आदी दिसत आहेत.

### सुटीची सुचना

१५ ऑगस्ट निमित्त दैनिक वादळ वार्ता कार्यालयास सुट्टी असल्यामुळे १६ ऑगस्ट वार शनिवारचा अंक प्रसारित होणार नाही याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.




# नायगाव विधानसभा प्रमुख पदी बाबासाहेब हंबर्डे यांची निवड

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

भारतीय जनता पार्टी नांदेड येथील पक्ष कार्यालय येथे नांदेड दक्षिण ग्रामीणचे जिल्हाअध्यक्ष संतुक हंबर्डे यांच्या अध्यक्षतेखाली बाबासाहेब पाटील हंबर्डे यांची ८९. नायगाव विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. बाबासाहेब हंबर्डे हे आमदार राजेश पवार यांचे निकटवर्तीय असून आमदार पवार यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हाध्यक्ष संतूक हंबर्डे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली आहे. या निवडीचे कारण असे की, संघटनात्मक कार्य पक्षाची ध्येयधोरणे, विचार, सरकारचे कार्य, व सरकारची योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी बाबासाहेब हंबर्डे यांचे कार्यकर्तृत्व यांचा विचार करता ही निवड करण्यात आली आहे. बाबासाहेब हंबर्डे हे नायगाव तालुक्यातील हुस्सा येथील रहिवासी असून हंबर्डे यांचा जीवन प्रवास पाहिला तर अगदी संघर्षमय राहिलेला असून ते राजकीय प्रवाहात गेले पंधरा ते वीस वर्षापासून सतत काम करत असल्याने यापूर्वी भाजपा संघटनात्मक पदावर भाजपा युवक जिल्हा चिटणीस, व त्यानंतर युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अशी पदे हाताळले असल्याने व संघटनात्मक पदाचा मोठा अनुभव असल्याने त्यांना पुन्हा संधी देत बाबासाहेब पाटील हंबर्डे यांची नायगाव विधानसभा अध्यक्षपदी निवड तर ९०. देगलूर विधानसभा



अध्यक्षपदी शंकर कन्तेवार आणि ९१. विधानसभा अध्यक्षपदी खुशाल उमरदरीकर यांची निवड करण्यात आली आहे. बाबासाहेब हंबर्डे यांनी गेले पंधरा वर्षांपासून हुस्सा ग्रामपंचायतीवर एक हाती सत्ता कायम राखत आणि त्यांचे धाडसी काम करण्याची क्षमता असून त्यांची कार्य कर्तुत्ववान नेतृत्व म्हणून ओळख निर्माण झाली आहें ते नायगाव पंचायत समिती उपसभापती प्रतिनिधी म्हणून देखील मागील पाच वर्षांमध्ये जनहितार्थ काम केले आहे. एकूणच त्यांच्या कामाचा वेग पाहता पक्षाने पुन्हा नवीन संधी देऊन त्यांच्यावर नायगाव विधानसभा अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. यावेळी आमदार राजेश पवार, नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे, बाबासाहेब हंबर्डे, यासह जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास केलाच नाही'मग आढावा कसला?

## क्या विकास पागल हो चुका है कहां गया ये विकास?

## लोकप्रतिनिधींना बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल

**बीड । प्रतिनिधी**

कोणी लोकप्रतिनिधी विकासाची आढावे घेत फिरतोय विकास केलाच नाही मग हे आढावेच कसले ? आम्हा जनतेला काही कळायला मार्ग नाही. विकासाचे आढावेच घ्यायचेआहेत ना तर या मग एकदा जमिनीवर, बीड शहराच्या गल्लोगल्ली लोकांच्या दारोदार एकदा फिराच आढावा नक्कीच भेटेल आढावा भेटेल तुमच्या सगळ्या कर्तुतीचा, तुमच्या सगळ्या चाळीस वर्षाच्या कारकिर्दीचा विकास घरी झोप घेऊन स्वप्नात होत नसतो.आजकाल विकास स्वप्नात तर येत नाहीये ना काय झाल आहे या विकासाला कुठे गेला आहै हा विकास लोकप्रतिनिधींच्या स्वप्नात तर जाऊ लागला नाही ना असं तर होत नाही ना रात्री स्वप्नात विकास केला आणि सकाळी उठून आढावे घेत फिरू लागले आहेत.अवघडच झाले आहे या विकासाचे शोधूनही सापडत नाहीये कहां गया है ये विकास' ? आज कल क्या करता है और कहा रहता है ये विकास ? क्या विकास सचमुच पागल हो चुका है मुझे सभी आवाम की तरफ से इन लोकप्रतिनिधींयो को पूछना है कि ये आढावे लेते वक्त, ये पागल हो चुका विकास कहीं मिला क्या



? हम सब को भी आके देखना है ये विकास होता कैसा है, दिखता कैसा है, रहता कहा पे है, जाता कहा पे है, और आता कहा से है और किसके किसके सपनो मे आता है !

खरंचच आढावे घेणाऱ्यांना बीड शहर बचाव मंचाच्या वतीने व सर्व जनतेच्या वतीने एकच प्रश्न आहे कुठे गेला आहे हा विकास आढावे घेताना तरी सापडला का काय खरंचच विकास पागल' झाला आहे.. सच मे विकास' पागल हो चुका है ? आढावे घेताना तरी हा कुठे भेटला का ? आढावे घेताना विकासाला भेटून तुम्ही जर धन्य झाला असाल तर आम्हालाही सांगा त्याची भेट घ्यायची आहे आणि आम्हालाही धन्य व्हायचे आहे. जे लोकप्रतिनिधी जनतेची दिशाभूल करून, व फक्त दिशाभूल करण्यासाठीच विकासाचे आढावे घेत फिरत आहेत त्या सगळ्यांना माझे सर्व जनतेच्या वतीने एकच आव्हान आहे की लोकांच्या दारोदारी, या शहरामध्ये गल्लोगल्ली फिरा आणि विकासाचा आढावाच घ्या. सर्व जनता आढावा देण्यासाठी डोळ्यात तेल' घालून तुमची वाट पाहत आहे. मग तुम्हाला नक्कीच कळेल विकास' क्यूं पागल हो गया है.... एकदा आढावा घ्यायला याच आणि होऊन जाऊ द्या दुधाचे दूध पाण्याचे पाणी किती खरं आणि किती खोटं होऊन जाऊ द्या एकदा जनतेच्या दरबारात आमने-सामने विकास' कुठे आहे ?

आढावा घेत फिरणाऱ्या लोकप्रतिनिधीने हा विकास कुठे व कधी केला होता हे आपल्या सगळ्यांना बघायला जायचे आहे मग येणार ना सगळेजण विकास' पाहायला ?

संपादकीय

# श्वानदंश



रात्री-अपरात्री घरी परतणे आता दिवसेंदिवस धोक्याचे बनत चालले आहे. ही भीती चोरट्यांची, लुटमार करणाऱ्यांची अथवा नशाबाज करणाऱ्यांची नसून भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाची आहे. भटक्या कुत्र्यांकडून एकवेळ भुकंणे समजू शकते; परंतु अलीकडे या कुत्र्यांच्या झुंडीमुळे अनेकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. ही समस्या कोणा भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. यामुळे स्वत: सर्वोच्च न्यायालयाला भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर स्वत:हून याचिका दाखल करून घ्यावी लागली. समस्येचे गांभीर्य त्यातूनच दिसून येते. आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्या लक्षणीय आहे. या श्वानप्रेमींना ही कुत्री स्वत:च्या घरात सांभाळायची नाहीत, तर रस्त्यावर, चौकाचौकांत असणाऱ्या भटक्या कुत्र्यांना खाद्य घालायचे आहे. एकीकडे श्वानांकडून होत असलेल्या उपद्रवाची जबाबदारी स्वीकारायची नाही आणि दुसरीकडे श्वानांविरोधात कारवाई केल्यास त्याविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलने करायची, न्यायालयाचे दरवाजे ठोठावयाचे अशा घटना श्वानप्रेमींकडून वाढू लागल्यात. रात्रीच्या वेळी उच्चभ्रू मंडळी आपल्या वाहनातून खाद्य घेऊन रस्त्यावर फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा शोध घेतात. राजधानी दिल्लीमध्ये सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल २६ हजारांहून अधिक जणांना मोकाट कुत्र्यांनी चावे घेतल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला या समस्येची दखल घ्यावी लागली. दिल्लीमध्ये चावा घेण्याच्या संख्येत वाढ होत असली तरी यावर्षी जानेवारी ते जून दरम्यान ६५ हजारांपेक्षा अधिक कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण झाले आहे. महापालिका कार्यक्षेत्रामध्ये रात्रीच्या वेळी कचरा संकलन करणाऱ्या, कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांना, धुरीकरण करणाऱ्यांना, मूषक नियंत्रण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व रात्रीच्या वेळी जे नागरी समस्या निवारणाचे व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करतात, त्यांना महिन्यातून अनेकदा कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी कुत्रा चावण्याच्या ३७ लाखांहून अधिक घटना घडत; ३०५ लोक रेबीजमुळे मरण पावतात. केवळ निर्बीजीकरण पुरेसे नाही, मानवी जीवितांचे संरक्षण करणे आता आवश्यक झाले आहे. ३७ लाख हा आकडा कागदोपत्री असला, तरी प्रत्यक्षात हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत असणाऱ्या कचराकुंड्या भटक्या कुत्र्यांचे माहेरघर बनले आहे. कचराकुंड्यांमध्ये सहजासहजी खाद्य उपलब्ध होत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी कचराकुंड्याभोवती दिसून येतात. घरात पाळल्या जाणाऱ्या कुत्र्यांची प्रशासन दरबारी नोंद करण्यास तसेच प्रशासनाकडे शुल्क भरणा करण्यास संबंधितांकडून टाळाटाळ केली जात असते. अनेकदा काही घटकांकडून लहानपणापासून घरामध्ये कुत्री पाळायची, पुढे तीच कुत्री रस्त्यावर सोडून दिली जातात.दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर मुंबईतील भटक्या श्वानांच्या बंदोबस्ताची मागणी आता मुंबईकर नागरिकांकडून सुरू झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उरण, नवी मुंबई, बदलापूर, अंबरनाथ, वसई-विरार भागातही मोकाट कुत्र्यांकडून चावे घेण्याचे, हल्ले करण्याची समस्या गंभीर झाली आहे. स्थानिक प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी श्वानाची धरपकड करण्याची मोहीम गल्लोगल्ली राबविली जात असते, त्यावेळी हे श्वानप्रेमी मोकाट कुत्र्यांना गच्चीवर तसेच सोसायटींच्या आवारात लपवून ठेवत असतात. गेल्या पंधरा वर्षांत १२ लाख ७३ हजार तर २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार २५३ मुंबईकरांना भटक्या श्वानांनी चावा घेतला आहे. त्यामुळे, भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करून त्यांनाही आश्रयस्थानात हलवण्याची मागणी होत आहे. २०१४ च्या गणनेनुसार मुंबईत ९५ हजार १७४ भटके श्वान होते. गेल्या अकरा वर्षांत मुंबईतील भटक्या श्वानांची संख्या काही लाखांत गेली आहे. मुंबईत गेल्या २२ वर्षांत १६ लाख ६० हजार भटक्या श्वानांचा प्रश्न कायम आहे. दरवर्षी मुंबई महापालिका या भटक्या श्वानांची निर्बीजीकरण करत असते. मात्र, दर पावसाळ्यात हा प्रश्न ऐरणीवर येतो. भटक्या कुत्र्यांची समस्या नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच पालिकेने उपाय करण्याची मागणी होत आहे. मुंबईतील अनेक आमदारांनीही मतदारसंघातीलच नाही तर शहर व उपनगरातील भटक्या कुत्र्यांना आळा घालण्यासाठी महापालिकेकडे टाहो फोडला आहे. मुंबई पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे काही आमदारांनी मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी करून, त्यांच्यासाठी आश्रयस्थाने तयार करून तेथे स्थलांतरीत करावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे, कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना कमी होतील आणि सार्वजनिक सुरक्षेची वाढती चिंता कमी होण्यास मदत होईल, असा दावाही केला आहे. २००९ ते २०२४ या कालावधीत भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी २४ कोटी ३ लाख २७ हजार रुपये खर्च करण्यात आले. भटक्या कुत्र्यांची समस्या मुंबईलगतच्या नवी मुंबई शहरातही आहे. तिथेही दिघा ते बेलापूरदरम्यान भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. यावर्षी जानेवारीपासून जुलै अखेरपर्यंत शहरात सात महिन्यांत ६ हजार ९३९ जणांना त्यांनी चावा घेतला. दिघा, ऐरोली व घणसोली तसेच एमआयडीसी परिसरात व गावठाण विभागात दहशत अधिक आहे. रात्रीच्या वेळी भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या फिरताना नवी मुंबईमध्ये ठिकठिकाणी दिसतात. रात्री उशिरा घरी येणाऱ्यांच्या मनात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. महापालिकेकडून श्वानांच्या निर्बीजीकरणाकडे दुर्लक्ष झाल्याने ही समस्या गंभीर झाल्याचा आरोपही होत आहे. भटक्या कुत्र्यांच्या समस्येची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली असली, तरी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रशासनाला नागरिकांकडून सहकार्य मिळणेही तितकेच गरजेचे आहे.

# मराठवाड्यातील धरणात मुबलक पाणीसाठा



मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यांत यंदा समाधानकारक पाऊस झाला. त्यामुळे मराठवाड्यात असलेल्या धरणांमध्ये सद्यस्थितीत मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. छत्रपती संभाजीनगर विभाग अंतर्गत एकूण ४४ मोठे प्रकल्प आहेत. त्या सर्व मोठ्या प्रकल्पात सध्या ४४९५.३ द.ल.घ.मी. उपयुक्त पाणीसाठा आहे. मराठवाड्यात असलेल्या मोठ्या प्रकल्पात सद्यस्थितीला ८०.६३ टक्के दलघमी पाणीसाठा आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा हा पाणीसाठा दुपटीपेक्षा खूप अधिक असल्याची शासन दरबारी नोंद आहे.पावसाळा सुरू झाल्यानंतर मराठवाड्यासाठी 'कही खुशी कही गम' अशी परिस्थिती आहे. एकीकडे नाशिक भागात झालेल्या चांगल्या पावसामुळे जुलै महिन्यातच जायकवाडी धरण ७३ टक्क्यांपेक्षा जास्त भरले असताना इतर प्रकल्प मात्र अद्याप निम्म्याहून कमी, तर काही प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा शिल्लक राहिला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण अवघे ५० टक्के इतके असल्याने शेतकरी हवालदिल झालाय. लावलेल्या पिकांना पाणी कमी पडल्याने काही प्रमाणात कीड लागलेली असल्याने दुबार पेरणीचे संकट अनेकांवर ओढवले आहे. राज्यात अभितांश ठिकाणी वरुणराजा प्रसन्न झाला असला तरी मराठवाड्यात अद्याप म्हणावा तसा पाऊस झाला नाहीये. मराठवाड्यात सरासरीपेक्षा फक्त ५० टक्के एवढाच पाऊस झालाय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये तर परिस्थिती अजून बिकट असून, पावसाळा अर्धा संपला तरी मोठा पाऊस जिल्ह्यात झालेला नाही. रिमझिम पावसामध्ये पेरण्या केलेल्या पिकांची वाढ खुंटलेली दिसून येत आहे. मागील आठ दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि रिमझिम पाऊस असल्याने पिकांवर रोग मोठ्या प्रमाणावर पसरलेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा फवारणीचा किंवा दुबार पेरणीचा खर्च वाढलाय. शेतकरी मोठ्या पावसाच्या अपेक्षेने आता आभाळाकडे पाहू लागला आहे.मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर विभाग अंतर्गत एकूण ८१ मध्यम प्रकल्प आहेत. त्यामध्ये सद्यस्थितीला १०५६.४२ दलघमी उपयुक्त पाणीसाठा आहे, तर वापरण्यायोग्य पाण्याची स्थिती देखील चांगलीच म्हणजे ४२.१८% दलघमी पाणीसाठा आहे. छत्रपती संभाजी नगर विभागअंतर्गत मराठवाड्यात ७९५ लघू प्रकल्प आहेत त्यामध्ये देखील मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा उत्तम पाणीसाठा आहे. मागच्या वर्षी अशा प्रकल्पात केवळ अठरा टक्के पाणीसाठा होता, तर यंदा हाच पाणीसाठा २९.७८% एवढा आहे. महाराष्ट्रात असलेल्या नागपूर, अमरावती, नाशिक, पुणे व कोकण या विभागाअंतर्गत असलेल्या धरणांपैकी सर्वाधिक धरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागअंतर्गत लहान, मोठे व मध्यम असे एकूण ९२० धरण आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आपेगाव उच्चस्तरीय बंधारा तसेच पैठण येथे असलेल्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा आहे. जायकवाडीचे धरण सद्यस्थितीला ९१.८८% भरले आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या बोरगाव, अंजनपूर, धनेगाव उच्चस्तरीय बंधारा, डोंगरगाव उच्चस्तरीय बंधारा, माजलगाव, मांजरा, रोशनपुरी तसेच शिरस व वांगदरी धरणात चांगली स्थिती आहे. बीड जिल्ह्यात देखील मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने त्या ठिकाणी असलेल्या प्रकल्पात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे मागच्या वर्षी बीड जिल्ह्यात असलेल्या माजलगाव धरणात १४ ऑगस्ट रोजी शून्य टक्के पाणीसाठा होता; परंतु आजच्या तारखेत त्या ठिकाणी ३१.७०% पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच मागच्या वर्षी सिरस मार्ग येथील निम्नस्तरीय बंधाऱ्यांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा होता; परंतु यंदा तोच पाणीसाठा ४७.५७% एवढा आहे. त्यामुळे मागच्या वर्षीच्या तुलनेत बीड जिल्ह्यातील धरणदेखील यंदा चांगले भरलेले आहेत.मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात सिद्धेश्वर व येलदरी असे दोन प्रकल्प आहेत. त्या प्रकल्पातही चांगला पाणीसाठा उपलब्ध आहे. सिद्धेश्वर धरणात ८१.६३% तर येलदरी धरणात ९२.८४% पाणीसाठा उपलब्ध आहे. नांदेड जिल्ह्यात असलेल्या आमदुरा, ढालेगाव, दिगडी, दिग्रस, हिरडपुरी, जोगलादेवी, किनवट, लोणी, सांगवी, निम्नमनार, मंगरूळ, मुदगड, राजाटाकळी व विष्णुपुरी प्रकल्पात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. नांदेड शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णुपुरी प्रकल्पात ८६.५३% एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. हा पाणीसाठा शहराला भर उन्हाळ्यात देखील पाणी पुरवेल एवढा साठा शिल्लक असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याबरोबरच धाराशिव जिल्ह्यातील औराद, गुंजाळगा, किल्लारी, लिंबाळा, निम्न तेरणा, मदनसुरी, राजेगाव, सीना व तागरखेडा धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. लातूर जिल्ह्यात असलेल्या भुसाणी, बीडगिहाळ कारसा पोहरेगाव, खुलगापूर, नागझरी, साई, शिवनी, टाकळगाव देवळा व वांजरखेडा उच्चस्तरीय बंधाऱ्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. एकेकाळी लातूर जिल्ह्यात रेल्वेने पाणी आणावे लागले होते, परंतु यंदाच्या वर्षी लातूर जिल्ह्यातील सर्वच लघू, मध्यम व मोठ्या प्रकल्पात समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध आहे. परभणी जिल्ह्यात असलेल्या निम्न दुधना प्रकल्पात यंदा चांगलाच पाणीसाठा आहे. या प्रकल्पात मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा खूप अधिक प्रमाणात पाणीसाठा आहे.१४ ऑगस्ट रोजी या धरणात ६३.५३% पाणीसाठा उपलब्ध आहे. मराठवाड्यात यंदा चांगला पाऊस झाल्यामुळे शेतकरी वर्ग आनंदात आहे. समाधानकारक पावसामुळे शेतातील पिके देखील चांगलीच डोलत आहेत. मराठवाड्यात शेतात असलेल्या पिकांची परिस्थिती चांगली आहे. पुढच्या आठवड्यात पोळा हा सण असल्याने पावसाळ्यात देखील शेतकरीराजा पोळा सण साजरा करण्याच्या दृष्टीने तयारीला लागला आहे. दरवर्षी पोळ्याला देखील चांगलाच पाऊस पडतो. यंदादेखील गेल्या आठ दिवसांपासून मराठवाड्यातील अनेक भागात पाऊस सुरू असल्याने पोळा सण आनंदात साजरा होणार, असे निसर्गाचे संकेत आहेत. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात यंदा चांगला पाऊस झाला. समाधानकारक पाऊस झाल्यामुळे मराठवाड्यातील धरणांची स्थिती मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा खूप चांगली आहे. त्यामुळे यावर्षीच्या उन्हाळ्यात मराठवाड्याला पाण्याची म्हणावी तेवढी चणचण भासणार नाही, अशी स्थिती सध्या तरी दिसून येत आहे.

# क्रेडिट कार्डबद्दल ग्राहकांच्या अपेक्षा




आजच्या तरुणाईला कॅशलेस व्यवहार फारच सोईचे आहेत असे वाटते. त्यामुळे क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, जी-पे (ऋ रि), पेटीएम इत्यादींचा वापर सर्रास होताना दिसतोय. यात सोय आहे हे मान्य केले तरी या व्यवहारांची नीट माहिती करून नाही घेतली, तर फसगत होण्याची शक्यता आहे. फसगत झालीच, तर तक्रार कुठे आणि कशी करता येते, पाठपुराव्यानेच कशी सोडवता येते यासाठी घेतलेला आढावा.हे प्रकरण आहे नवी दिल्ली येथील. पराग हे एचडीएफसी (कऊऋउ) बँकेचे क्रेडिट कार्डधारक. गेली १० वर्षे अगदी वेळेवर क्रेडिट कार्डाचे बिल भरणारे ग्राहक. ३० मार्च २०१४ रोजी रात्री १२.४२ ते १२.५६ या दरम्यान कोणीतरी पराग यांच्या क्रेडिट कार्डावरून एकूण २४ हजार रुपयांचे वेगवेगळे व्यवहार केले. या व्यवहारांबाबत एचडीएफसी बँकेच्या टीमकडून पराग यांना पुष्टीकरण (लेपषळीरींळेप) कॉल आला. पराग यांनी आपण असे व्यवहार केल्याला नकारार्थी उत्तर दिले. दुसऱ्या दिवशी सकाळीच पराग यांनी हा वादग्रस्त व्यवहार जाणून घेण्यासाठी एफडीएफसी बँकेच्या ग्राहक सेवेशी संपर्क साधला. त्यांना बँकेने वादविवाद (वळीीींश) फॉर्म पाठवण्याची विनंती केली. तो फॉर्म पाठवल्यावर बँक हा व्यवहार उलट करून पराग यांचे पैसे परत करेल असेही सांगितले. नंतर त्यांना बँकेकडून अजून एक, फोनद्वारे पोलीस तक्रारीची प्रतही पाठवण्यास सांगितले. पोलीस तक्रार केल्याची प्रत पाठवल्यावर तीन दिवसांनी पराग यांना प्रोग्रेसिव्ह डिस्प्युट फॉर्म पाठवण्यास सांगितले गेले. तोही त्यांनी पाठवला. सर्व औपचारिकता पूर्ण करूनही बँकेने तो व्यवहार उलट केलाच नाही. तर पराग यांना ते पैसे भरावे लागतील असे सांगितले. शेवटी नाईलाजाने पराग यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे तक्रार दाखल केली.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचात त्यांची तक्रार फेटाळली गेली. त्यामुळे पराग यांनी या निर्णयाविरुद्ध राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. पण गुन्हेगारी स्वरूपाच्या वादांशी संबंधित मुद्दे ग्राहक संरक्षण कायद्याच्या तरतुदीनुसार संक्षिप्त खटल्यांतर्गत हाताळले जाऊ शकत नाहीत, असे निरीक्षण नोंदवून राज्य आयोगानेही जिल्हा मंचाचा आदेश कायम ठेवला. काहीही चूक नसताना हकनाक २४ हजार रुपयांचा भुर्दंड सहन करायला पराग तयार नव्हते. त्यांनी राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे पुनर्विचार याचिका दाखल केली. त्या अर्जात त्यांनी आरबीआयच्या एका परिपत्रकाचा उल्लेख केला. यात स्पष्ट म्हटले आहे की, जर ग्राहकाने ऑनलाईन गैरवापर किंवा फसवणूक व्यवहाराची माहिती १० दिवसांच्या आत बँकेला दिली तर ग्राहक ती रक्कम भरण्यास जबाबदार नाही. पराग यांनी फसवणुकीच्या व्यवहाराची माहिती बँकेला १० मिनिटातच दिली होती. त्यामुळे त्यांनी अर्जात ही रक्कम भरण्यास मी जबाबदार नाही असे स्पष्ट लिहून दिले. माझ्या क्रेडिट कार्डद्वारे मी जी रक्कम वापरली त्याचा भरणा मी वेळेवरच केला आहे असेही त्यांनी दाखवून दिले. राष्ट्रीय आयोगाने असे म्हटले की हे प्रकरण फसवणुकीचे किंवा फौजदारी खटल्याशी संबंधित आहे. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत खटला चालवता येणार नाही. तथापि सेवा देणाऱ्याने अर्थात बँकेने सेवेत कमतरता दाखवली असेल तर ग्राहक मंचाला या प्रकरणाची तपासणी करण्याचे अधिकार आहेत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम २(१) (ओ)अंतर्गत बँकिंग सेवेला सेवा म्हणून समाविष्ट केलंय. तक्रारदार हा एफडीएफसी बँकेने जारी केलेल्या क्रेडिट कार्डाचा वापरकर्ता आहे. गेली १० वर्षे तो क्रेडिट कार्डाचे बिल नियमितपणे वेळेवर भरतोय. तो ग्राहकाच्या व्याख्येत येतो आणि ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राहक न्यायालयात तक्रार दाखल करण्याचा त्याला अधिकार आहे.राष्ट्रीय आयोगाने आरबीआयने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचाही संदर्भ दिला. या सूचनेनुसार बँकेकडून योगदानात्मक फसवणूक किंवा सेवेत कमतरता होऊन अनधिकृत व्यवहार झाल्यास ग्राहकाची जबाबदारी शून्य असेल. या सूचना तृतीय पक्षाच्या उल्लंघनाचीही काळजी घेतात. कमतरता बँकेत किंवा ग्राहकात नसून सिस्टिममध्ये इतरत्र आहे, असे आढळल्यास अशावेळी ग्राहकाने अशा व्यवहारांची माहिती ३ कामकाजाच्या दिवसांत बँकेला दिली, तर ग्राहकाची जबाबदारी शून्य असेल. या प्रकरणात पराग यांनी त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या सर्व उपाययोजना केल्या. त्यांच्या क्रेडिट कार्डाचा वापर कोणीतरी फसवणुकीने केला होता. याबाबत पराग यांचा कोणताही निष्काळजीपणा झाला नसल्याचे आयोगाच्या चौकशीत आढळून आले. राष्ट्रीय आयोगाने राज्य आयोग आणि जिल्हा मंचाचे आदेश रद्द ठरवले. एचडीएफसी बँकेला असा आदेश दिला की जर पराग यांना बँकेने २४ हजार रुपये भरायला लावले असतील, तर ते ताबडतोब भरलेल्या दिवसापासून वार्षिक ७% दराने दंडासहित परत करावेत. तसेच खटल्याचा खर्च म्हणून दहा हजार रुपये त्यांना द्यावा. हा निर्णय आहे डिसेंबर २०२३ चा, म्हणजे तब्बल ९ वर्षांनी पराग याना न्याय मिळाला. बघितलत मंडळी. आपली चूक नसूनही एवढी वर्षे लागली न्याय मिळवण्यासाठी. तरीही नेटाने पाठपुरावा करून पराग यांनी पैसे आणि मानसिक समाधान दोन्ही मिळवले. एक सजग ग्राहक म्हणून हे अत्यंत आवश्यक आहे, नाही का?

# आ.राजेश पवार यांच्या जनता दरबारात तक्रारींचा पाऊस : जनता दरबार चालला तब्बल सात तास

## गोरगरीबांकडून चिरीमिरी घेतली, तर गाठ माझ्याशी–आ. राजेश पवार यांचा इशारा

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार तथा कार्यसम्राट आ. राजेश पवार यांनी नुकतेच पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर नायगाव तालुक्यातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शुक्रवारी नायगाव तहसील कार्यालयातील नुतन सभागृहात 'जनता दरबारा'चे आयोजन केले होते.या जनता दरबारात पादन रस्ते, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा तसेच घरकुल लाभार्थ्यांच्या समस्या आदी अनेक तक्रारी मांडण्यात आल्या. स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून विविध प्रश्न उपस्थित केल्याने दरबारात तक्रारींचा अक्षरशः पाऊस पडला. तक्रार ऐकताच आ. पवार यांनी संबंधित अधिकारी कर्मचा-यांना एका एकांना समोर बोलवून थेट जनतेसमोरच जाब विचारला आणि तातडीने कारवाईचे निर्देश दिले. यावेळी आ. राजेश पवार यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, गोरगरीबांकडून चिरीमिरी घेण्याचा प्रयत्न केल्यास गाठ माझ्याशी आहे हे लक्षात ठेवा

या जनता दरबारात प्रशासन आणि जनतेमध्ये थेट संवाद घडून आल्यामुळे अनेकांचे प्रश्न मार्गी लागले असून नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.मध्ये काही महिने जनता दरबार झाले नाही त्यामुळे तालुक्यातील शेकडो नागरीकांच्या तक्रारी होत्या. शुक्रवारी झालेल्या जनता दरबारात तालुक्यातून शेकडो महीला,पुरुष,वयोवृद्ध आपल्या तक्रारी घेऊन आले होते.आ.राजेश पवार यांनी एका एकाना जागेवर उभे करून त्यांची तक्रार ऐकून घेण्यासाठी त्याच्या हातात माईक देऊन तक्रार ऐकुन घेतले व तक्रारीचे निवारण करण्यासाठी संबंधित आधिकारी किवा कर्मचा-यांना जागेवर उभे करून उत्तर देण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे



सर्वात जास्त तक्रारी घरकुल धारकांनी घेऊन आले होते. या संबंधित जेवढे काही अधिकारी येतात त्यांना समोर बोलवून एका एकाची हजेरी घेऊन या पुढे एकाही घरकुल धारकांची तक्रार येऊ देणार नाही अशी शपथ संबंधित कर्मचा-यांकडुन घेण्यात आली. यावेळी जि.प.च्या माजी सदस्या पुनमताई पवार , बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोम्बे, तहसीलदार धमप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी वानखेडे ,सा.बां.चे उपअभियंता बारसकर ,पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता सरनाईक,उप अभियंता होनराव, सी.डी.पी.ओ. वनशेट्टे , जे.ई. गोणेवार,मयुर जिरवणकर,नाईकवाडे, धाबे, ए.पी.ओ.कदम ,जेई पाटील, पोलीस निरीक्षक मारकड ,स.पो.नि.भोसले , स.पो.नि.विक्रम हराळे यांच्यासह भाजपचे तालुकाध्यक्ष बालाजी मदेवाड, श्रीहरी देशमुख, हबर्डे, भाजप शहराध्यक्ष माधव पा.कल्याण,सरपंच प्रमेश्वर पा. सोमठाणकर, गंगाधर पा., उपसरपंच व्यंकटराव पा.राहेरकर,सरपंच प्रा. मनोहर तोटरे, सुनिल लुगारे,सरपंच रंजित कुरे, प्रकाश पा.हेन्डगे,दत्ता पा.ढगे,धनजय पा.जाधव,फत्ते, राहुल पा.शिंदे, उपसरपंच नागेश पा.काहाळेकर,सोपान कदम, संजु पा.चोंडे,आवकाश पा.धुप्पेकर,राजेंद्र पा. कुंचेलीकर यांच्यासह विभागाचे अधिकारी कर्मचारी सरपंच उपसरपंच सदस्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुनर्विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचार?

# प्रसिद्ध अभिनेते व कवी किशोर कदम यांचे मुंबईतील घर धोक्यात

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे मदतीची साद

**मुंबई (वृत्तसंस्था)**

प्रसिद्ध अभिनेते आणि 'कवी सौमित्र' म्हणून ओळखले जाणारे किशोर कदम सध्या गंभीर अडचणीत सापडले आहेत. अंधेरी (चकाला) येथील त्यांचे राहते घर पुनर्विकासाच्या प्रक्रियेत धोक्यात आले असून, त्यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यातील जनतेला मदतीचे आवाहन केले आहे.

किशोर कदम यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ते राहात असलेल्या सोसायटीच्या पुनर्विकासाच्या प्रक्रियेत पी.एम.सी. आणि बिल्डर यांनी संगनमताने काम केले आहे. बहुमताचा आधार घेत कमिटी सदस्यांनी सभासदांची दिशाभूल केली, काही महत्त्वाची कागदपत्रे आणि माहिती लपवून गोंधळ निर्माण केला. कालच लक्षात आले की, अंधेरी (चकाला) या प्राईम लोकेशनमधील



इमारत DCPRच्या 33(11) आणि ३३(१२)(इ) कलमान्वये SRA/स्लम पुनर्विकास योजनेखाली करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

त्यांच्या मते, हा बहुमताच्या संकल्पनेचा गैरवापर असून, ज्येष्ठ व कायद्याची जाण असलेल्या सभासदांचा आवाज अशा प्रकारे दाबला जातो. जर एखादा सदस्य चौकस व कायद्याच्या आधारावर प्रश्न विचारत असेल, तर त्याला वेगळे काढून स्वतंत्र गट तयार केला जातो, माहिती लपवली जाते, आणि तो पुनर्विकासाच्या विरोधात आहे असा खोटा आभास निर्माण केला जातो. हे 'शहरी अन्याय' (Urban -trocity) असून, याविरोधात कायद्यात विशेष तरतूद नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

किशोर कदम यांनी पुढे लिहिले की, अशा परिस्थितीत PMC आणि बिल्डर या दोघांची आर्थिक ताकद सामान्य नागरिकांसाठी लढा देणे अवघड करून टाकते. अशा अनेक प्रकरणांचा निकाल वर्षानुवर्षे प्रलंबित असतो. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच महाराष्ट्रातील नागरिकांना आपल्या घराच्या रक्षणासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, ही केवळ त्यांच्या घराची लढाई नाही, तर पुनर्विकासातील अन्यायाविरोधात सामान्य माणसाच्या हक्कांची लढाई आहे.

## स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहणावरून नाराजी नाट्य?

# नाशिक न मिळाल्याने भुजबळांचा गोंदियाला जाण्यास नकार,मंत्री लोढांवर दिली जबाबदारी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीत आधीच तणाव निर्माण झाला असताना, स्वातंत्र्यदिनी कोणत्या जिल्ह्यात कोण मंत्री ध्वजारोहण करणार यावरूनही नाराजीचे वारे वाहू लागले आहेत. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ गोंदिया जिल्ह्यात ध्वजारोहणासाठी सांगण्यात आले होते. मात्र, नाशिक न भेटल्याने त्यांनी गोंदिया जिल्ह्यात ध्वजारोहण करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आता त्यांच्या जागी पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा गोंदियामध्ये १५ ऑगस्टला ध्वजारोहण करणार आहेत. या बदलाबाबत शासनाने नवीन परिपत्रक जारी केले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांचे अलीकडेच गुडघ्याचे ऑपरेशन झाले असून सध्या त्यांना हालचाल करणे कठीण आहे. त्यामुळे त्यांची जागी छगन भुजबळ यांना गोंदियात ध्वजारोहण करण्याची जबाबदारी दिली होती, पण आता त्यांनीही तब्येतीचे कारण पुढे करत गोंदियात ध्वजारोहण करण्यास नकार दिला. परिणामी मंत्री मंगलप्रभात लोढा हे स्वातंत्र्यदिनी गोंदिया जिल्ह्यात ध्वजारोहण सोहळ्यासाठी जातील. अशी माहिती समोर आली आहे.

दरम्यान, सामान्य प्रशासन विभागाने स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणासाठी विविध जिल्ह्यांतील मंत्र्यांच्या नियुक्तीची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार रायगडमध्ये अदिती तटकरे आणि नाशिकमध्ये गिरीश महाजन ध्वजारोहण करणार आहेत. रायगडमधील या निर्णयामुळे स्थानिक मंत्री भरत गोगावले यांच्या नाराजीच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.दुसरीकडे, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यंदा पालकमंत्री म्हणून पहिल्यांदाच बीड येथे ध्वजारोहण करणार आहेत. त्यामुळे पुण्यात राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. गेल्या आठवड्यातच बीडच्या दौऱ्यात अजित पवार यांनी विकासाच्या आश्वासनांसह गुन्हेगारांना कठोर इशारा दिला होता, आणि आता स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ते पुन्हा बीडच्या नागरिकांना भेटणार आहेत.

# करमाळा पोलिस ठाण्यात आरोग्य तपासणी शिबिर

**सोलापूर । प्रतिनिधी**

१३ ऑगस्ट रोजी करमाळा पोलिस ठाण्यात पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. पोलिसांना दिवसरात्र कर्तव्य बजावताना आरोग्याकडे दुर्लक्ष करावे लागते, त्यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि मानसिक ताण यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. ही बाब लक्षात घेऊन करमाळा उपजिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने हे शिबिर भरवण्यात आले.शिबिरात संपूर्ण रक्तगणना तपासणी, यकृत व मूत्रपिंड कार्य तपासणी, मधुमेह तपासणी (ग्लायकोसिलेटेड हिमोग्लोबिन चाचणी), मानव इम्युनोडेफिशियन्सी विषाणू तपासणी, उपदंश तपासणी आणि थायरॉईड कार्य तपासणी अशा तपासण्या करण्यात आल्या.या वेळी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन गुंजकर, वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रमोद खोबरे, समुपदेशक कपिल भालेराव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ज्ञानेश्वरी पाटील आणि संपर्क कार्यकर्त्या अनिता जगताप उपस्थित होत

# राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेचा निकाल जाहीर

**सोलापूर । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त करमाळा येथील सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाईन भक्तीगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत राज्यभरातील विविध जिल्ह्यांमधून एकूण ५१ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देण्यात येणार आहे. रोख बक्षीस प्रथम क्रमांकासाठी रु. ३००१, द्वितीय क्रमांकासाठी रु. २००१, तृतीय क्रमांकासाठी रु. १००१ आणि



उत्तेजनार्थ रु. ५०० असे असून, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.या स्पर्धेत प्रथम क्रमांक श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय तुळजापूर (जि. धाराशिव) यांना मिळाला. द्वितीय क्रमांक कु. स्नेहा गोविंद मुरकुटे (लातूर) यांनी तर तृतीय क्रमांक कु. तनुश्री मुकुंद हांडे (सोलापूर) हिने पटकावला. उत्तेजनार्थ बक्षीस कुमारी वानेश्री अमोल घाडगे (करमाळा), कु. शाल्मली हनुमंत फाटक (बारामती) आणि कु. मैत्रयी अनिकेत कुलकर्णी (बीड) यांना देण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. जयभीम शिंदे (परंडा), प्रा. वृंदा कुलकर्णी (आंबेजोगाई) आणि गायिका पूजा कोहळे (वाई) यांनी काम पाहिले. स्पर्धेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल सुरताल संगीत विद्यालयाचे प्रमुख प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी सर्व स्पर्धकांचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले. विजेत्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण २४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी तीन वाजता होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुरताल संगीत महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे खजिनदार संतोष पोतदार गुरुजी यांनी दिली.

# जिल्हा कार्यकारणीतून निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्याने संतापाची लाट

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हा कार्यकारणीच्या नव्या यादीतून निष्ठावान व जुने कार्यकर्ते वगळल्याने पक्षात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहादा- तळोदा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी यांनी प्रत्यक्ष जिल्हाध्यक्ष व प्रदेश कार्यकारणीत शिफारस पत्र देऊनही ही नावे यादीतून वगळण्यात आली. याशिवाय भरत माळी यांच्या एकाच कुटुंबातून त्यांच्यासह भाऊ व पुतणे असे ३ जणांना वगळल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संतापाची भावना वाढीस लागली आहे.

जिल्हा कार्यकारणीच्या यादीतून तळोद्यातील माजी नगराध्यक्ष भरत माळी, जितेंद्र सूर्यवंशी, सुरेश गुलाल माळी, भगवान माळी, संजय माळी, ईश्वर पाडवी, नारायण ठाकरे, अनिता कलाल आदी कार्यकर्त्यांची नावे वगळण्यात आली आहेत. हे सर्व कार्यकर्ते केवळ निवडणुकीतच नव्हे तर वर्षभर पक्षासाठी विविध उपक्रमांत कार्यरत राहिले आहेत. विशेषतः माजी नगराध्यक्ष भरत माळी, माजी प्रतोद संजय माळी व स्वीकृत नगरसेवक जितेंद्र सूर्यवंशी यांना स्थान न मिळाल्याने भरत माळी गट नाराज आहे. काँग्रेसमधून आ.राजेश पाडवी यांच्या भूमिकेतून भाजपात दाखल झालेले भरत माळी तीन वेळा नगराध्यक्ष, जिल्हा बँक संचालक व विविध पदांवर कार्यरत राहिले असून तळोदा शहरात त्यांचा मोठा प्रभाव आहे. त्यांना डावलल्याने कार्यकर्त्यांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे जितेंद्र सूर्यवंशी यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान महत्वपूर्ण रणनीती आखून प्रचार मोहिमेचे यशस्वी नियोजन केले होते. गावोगावी प्रचार यंत्रणा उभी करण्यापासून ते कार्यकर्त्यांना प्रेरित करण्यापर्यंत त्यांचा हातभार मोलाचा होता. विविध शिबिरांचे आयोजन आणि पक्षविस्तार मोहिमांमध्ये ते अग्रस्थानी राहिले.प्रसिद्ध कथाकार प्रदीप मिश्रा यांच्या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनातही त्यांनी प्रमुख भूमिका निभावली होती.

सुरेश गुलाल भगवान माळी, हे पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत.पक्षाच्या झुकत्या काळात त्यांनी पक्षासोबत काम केले आहे. संजय माळी ४ वेळा नगरसेवक राहिले आहे. अनिता कलाल यांनी यापूर्वी भाजपकडून तालुका महिला अध्यक्षपद भूषवले होते. माजी नगरसेवक ईश्वर पाडवी, आमदारांचे जवळीक असलेले नारायण ठाकरे, हेही कार्यकर्ते संघटन व शिस्तीच्या बाबतीत ओळखले जातात. पक्षाच्या चांगल्या-वाईट काळात त्यांनी खंबीरपणे साथ दिली आहे. त्यामुळे, त्यांना वगळण्याचा निर्णय हा मेहनती व निष्ठावान कार्यकर्त्यांचा अपमान असल्याचे मत तळागाळातील अनेकांनी व्यक्त केले आहे.काही कार्यकर्त्यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त करत म्हटले, आमचा वापर केवळ काम करून घेण्यासाठीच होतो. गरज संपली की आम्हाला विसरले जाते. ही भावना आता कार्यकर्त्यांच्या वतीने सोशल मीडियावरूनही व्यक्त होत असून, समर्थकांनी याबाबत पोस्ट, व्हिडिओ आणि प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली आहे. राजकीय जाणकारांच्या मते, ही बाब केवळ जिल्हा पातळीपुरती मर्यादित राहणार नाही. प्रदेश पातळीवरही याचे पडसाद उमटू शकतात. अशा निर्णयांमुळे संघटनातील समर्पित कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होऊन पक्षाची भक्कम रचना डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.दरम्यान, आमदार राजेश पाडवी, भरत माळी व जिल्हा पदाधिकाऱ्यांकडून या विषयावर अद्याप कोणतेही अधिकृत विधान आलेले नसले तरी, कार्यकर्त्यांमध्ये याविषयी चर्चेची जोरदार चर्चा सुरू आहे.

भाजपकडून अद्याप कुणाला ही डावलण्यात आलेले नाही, काही जणांचे नावे स्वतः आमदार राजेश पाडवी यांची शिफारशी नुसार सादर करण्यात आले होते. मात्र वरिष्ठ कार्यालयाने त्यांना मोठी जबाबदारी देण्याचा निर्णय घेतला असावा म्हणून त्यांना तूर्तास जबाबदारी पासून राखून ठेवले आहे. यात विशेषतः भरतभाई माळी यांच्या कुटुंबीयांचा सन्मान राखला जाईल याबाबत विश्वास आहे.
गौरव वाणी ,शहर अध्यक्ष भाजप तळोदा

निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून अन्य पक्षातून आलेल्यांना कार्यकारणीत स्थान देणे ही अन्यायकारक बाब आहे. जेव्हा भाजपाला उमेदवार मिळत नव्हते, तेव्हा निष्ठावंतांनीच पक्षासाठी निवडणुका लढवल्या व विजय मिळवून दिला. मात्र आज परिस्थिती बदलली असून निष्ठावंतांची उपेक्षा होत आहे. कार्यकारणीत झालेल्या या बदलांना माझा ठाम विरोध आहे, कारण यामुळे निष्ठावंतांचा आत्मविश्वास कमी होईल आणि पक्षातील एकजूट धोक्यात येईल.
सुरेश गुलाल माळी,माजी उप नगराध्यक्ष तळोदा

## खासदार बजरंग सोनवणे यांची दमदार एन्ट्री

# कपिल मस्के यांच्या आमरण उपोषणाला यश, गायरान धारकांना मिळाला न्याय

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गायरान जमीन प्रकरणासह विविध अनियमिततेविरोधात सुरू असलेल्या आमरण उपोषणाला अखेर यश मिळाले. केज नगरपंचायतीचे माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता केज तहसील समोर आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणात सरकारी कार्यालयांमधील अनियमितता, शर्तभंग, गायरान जमीन व्यवहारातील गैरप्रकार तसेच विविध योजनांतील निधीच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती.

उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी बीड जिल्ह्याचे सिंघम म्हणून ओळखले जाणारे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची दमदार एन्ट्री होताच प्रशासन तत्परतेने हालचाल करू लागले. तहसीलदार राकेश गिड्डे, नगरपंचायतचे मुख्याधिकारी गायकवाड आणि भुमि अभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित राहून सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यात आली.

गायरान धारकांनी उपोषणाच्या पहिल्या दिवसापासूनच मोठ्या संख्येने उपस्थित राहून कपिल मस्के यांना पाठिंबा दिला. प्रशासनाने अखेर लेखी आश्वासन देत गायरान धारकांच्या मागण्या मान्य केल्या. त्यानंतर खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते नारळपाणी पिऊन कपिल मस्के यांनी काही काळासाठी उपोषण मागे घेतले.



## तुलसी महाविद्यालयात ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत ध्वजारोहण

### कला व ज्ञानस्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी जागवला राष्ट्रप्रेमाचा संदेश

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात गुरुवार, दि. १३ आणि १४ ऑगस्ट रोजी सकाळी ७.४५ वाजता ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम महाविद्यालय, नेकनूरचे प्राचार्य प्रा.डॉ.विजयकुमार बांदल, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.डी.राऊत, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

हर घर तिरंगा अभियान २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबवले जात आहे. या अनुषंगाने महाविद्यालयात देशभक्तीपर वातावरण निर्मितीसाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात रांगोळी, मेहंदी, प्रश्नमंजुषा, पीपीटी, कोडिंग आणि संगणक आधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ज्यांतून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व राष्ट्रप्रेमाचा संदेश प्रकट केला.या आयोजित स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव उद्या, १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात करण्यात केला जाणार असल्याचे प्राचार्यांनी कळवले.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग तसेच संगणक व मॅनेजमेंट विभाग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राद्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.




## होळ येथे आयपीएस अंकुशराव शिंदे यांचा रविवारी होणार सेवापूर्ती सन्मान सोहळा

### कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांचे आवाहन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांनी सेवानिवृत्तीला ४ महिने शिल्लक असताना स्वेच्छानिवृत्ती घेतली. यानिमित्ताने त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा होळ येथे रविवारी (दि.१७) सकाळी १०.३० वाजता हनुमान मंदिरात ग्रामस्थांच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अश्विनीताई शिंदे ह्या असतील. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे, मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्तासाहेब शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, माजी अपर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, पुणे सीआयडीचे पोलीस उपाधीक्षक दीपक शिंदे, नागपूरचे महावितरण कंपनीचे माजी मंडळ अभियंता लक्ष्मण खाडे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, प्रा.डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन सर्व ग्रामस्थांनी केले असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवानिवृत्त विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. दरम्यान, होळच्या मातीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह विशेष पाहुण्यांच्या उपस्थितीत होणारा हा सोहळा गावासाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.



## सामूहिक वनहक्क क्षेत्रात कामांना गती देण्यावर भर

### अक्कलकुवा,तळोदा,अक्राणी तालुक्यांची संयुक्त बैठक

**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा, अक्राणी आणि तळोदा या तीन तालुक्यांतील सामूहिक वनहक्क क्षेत्रातील कामांना गती देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट रोजी तळोदा येथे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत नरेगा अंतर्गत कामांना प्राधान्य देऊन वनक्षेत्र वाढवणे आणि स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊन स्थलांतर कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

बैठकीत प्रकल्प अधिकारी नावंदर यांनी यवतमाळ जिल्ह्याचा आदर्श घेऊन नंदुरबार जिल्ह्यात सर्व विभागांनी (कृषी, वन, ग्रामसभा, बांधकाम इत्यादी) एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. प्राथमिक टप्प्यात ११ गावांमध्ये स्थळ पाहणी करून कामांची निवड करावी, तसेच वैयक्तिक वनहक्क धारकांचे सीमांकन करण्याचे निर्देश दिले. बांबू लागवडीवर भर देण्यासोबतच नरेगाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यावरही भर देण्यात आला. प्रत्येक विभागाने किमान चार महिन्यांचा नियोजन आराखडा तयार करुन तो प्रकल्प कार्यालयाकडे सादर करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या.

या बैठकीनंतर प्रकल्प अधिकारी आणि इतर सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी हरणखुरी गावाला भेट दिली. हरणखुरीचे सरपंच अर्जुन पावरा यांनी गाव स्थलांतरमुक्त करण्यासाठी राबवलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. त्यांनी रोजगार हमी योजनेतून वेगवेगळ्या विभागांमार्फत कामे घेऊन वर्षभर रोजगार कसा उपलब्ध करून दिला, याबद्दल सांगितले. सामूहिक कामांना प्राधान्य देऊन शिवारफेरी, अतिक्रमण रोखणे, आणि लोकसहभागावर भर दिल्याने गावातील एकही कुटुंब रोजगारासाठी बाहेरगावी जात नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, भगदरीचे सरपंच पिरेसिंग पाडवी यांनी १२ गावांमध्ये बांबू लागवड करून वनहक्क क्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दिली. बांबू समन्वयक निरंजन चोपडे यांनी बांबू लागवडीचे महत्त्व समजावून सांगितले. या दौऱ्यात हरणखुरी येथील शेततळी, सीसीटी, टीसीएम, बांबू लागवड, विहिरी आणि वृक्ष लागवड आदीं कामांची पाहणी करण्यात आली. इतर गावांना प्रेरणा मिळावी आणि अशाच प्रकारची कामे त्यांच्या गावातही सुरु व्हावीत, या उद्देशाने हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या बैठकीला व दौऱ्याला विविध विभागांचे अधिकारी, सरपंच, आणि सामूहिक वनहक्क समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सुषमादेवी यांना महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा राज्यस्तरीय महाकवी वामनदादा कर्डक पुरस्कार २०२५ नुकताच जाहीर करण्यात आला असून, पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे. या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी २०२५ सालचे मानकरी म्हणून प्रख्यात भीमगीत गायिका भीमकोकिळा सुषमादेवी मोटघरे यांना जाहीर झाला आहे. हा गौरव समारंभ येत्या २८ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे पार पडणार आहे. सोहळ्याचे अध्यक्षस्थान नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे भूषवणार असून, या कार्यक्रमास सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

सुषमादेवी यांनी आपल्या आवाजातून आंबेडकरी चळवळीला नवी उभारी दिली. त्यांचे माझ्या भीमाच्या नावाचं कुंकू लावलं रमानं हे गीत चार दशकांपूर्वी प्रचंड लोकप्रिय झाले असून आजही समाजमनावर तितकाच प्रभाव पाडते. या गीतामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीची निष्ठा घराघरांत पोहोचली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक दर्जेदार भीमगीते त्यांनी समाजाला अर्पण केली असून, त्यामुळेच त्यांना भीमकोकिळा ही उपाधी लाभली. त्यांच्या गाण्यांचा प्रभाव आजही नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे.

यंदाच्या सोहळ्यात सुषमादेवी यांच्या मुख्य सन्मानासोबतच आंबेडकरी चळवळीतील तीन मान्यवर गायकांचाही गौरव करण्यात येणार आहे. आयु.धोंडीराम रोडे, आयु. छायाबाई कोकाटे आणि आयु. बळीराम उपाडे यांचा विशेष सत्कार होणार असून, त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक योगदानाचा गौरव समारंभात करण्यात येईल.



# धवळीविहिर आदर्श शाळेचे लोकार्पण व सोमावल शाळेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन संपन्न

### सर्वांगीण शिक्षणातून संस्कारक्षम पिढी निर्माण होते-ॲड.माणिकराव कोकाटे

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शिक्षण हे दर्जेदार असले पाहिजे त्याचबरोबर ते सर्वांगीण स्वरूपाचे असले पाहिजे, कारण सर्वांगीण शिक्षणातूनच संस्काक्षम पिढी निर्माण होत असते, असे प्रतिपादन राज्याचे क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा पालकमंत्री अँड. माणिकराव कोकाटे यांनी केले आहे.

ते दिनांक १४ रोजी तळोदा तालुक्यातील धवळीविहिर येथे मुख्यमंत्री आदर्श शाळा लोकार्पण व सोमावल येथील शाळेच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते. धवळीविहिर, सोमावल येथे स्वतंत्र झालेल्या कार्यक्रमांना आमदार राजेश पाडवी, आमदार आमश्या पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर, जि. प. चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, अभिजित मोरे, डॉ. शशिकांत वाणी यांच्यासह धवळीविहिर, सोमावल येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना पालकमंत्री ॲड. कोकाटे म्हणाले, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी व ग्रामस्थ यांच्यातील समन्वयातून विकासाच्या सर्व क्षेत्रात उल्लेखनीय बदल होवू शकतात. विद्यार्थी दशेतच चांगले शिक्षण आणि संस्कार मिळाले तर एक आदर्श पिढी निर्माणाची प्रक्रिया सुरू होत असते. जिल्ह्यातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, यासारख्या पायाभूत सुविधांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी शासन-प्रशासन प्रयत्नशील असून त्यासाठी वेगवेगळ्या पातळीवर निधी उपलब्ध करून दिला जातो आहे.

ते पुढे म्हणाले, आपल्या जिल्ह्यातील शिक्षण सुविधांच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत ९ शाळांसाठी १२ वर्गखोल्या बांधण्यासाठी १ कोटी ५६ लाख रुपये, तसेच ५ इमारत नसलेल्या शाळांच्या बांधकामासाठी २ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जिल्हा परिषद सेस निधीतून २० कोटी ५० लाख रुपये मंजूर होऊन ७६ शाळांसाठी ११५ वर्गखोल्या, तर एम्पथी फाउंडेशनच्या सहकार्याने ६ शाळांसाठी २४ वर्गखोल्या उभारण्यात येणार आहेत. याशिवाय, तोरणमाळ येथील निवासी शाळेत काँक्रीट गटार आणि रस्त्याचे कामही मंजूर करण्यात आले आहे.या कार्यक्रमात परिसराच्या सर्वांगीण विकासाची गरज, वर्तमान आणि भविष्याच्या अनुषंगाने आमदार राजेश पाडवी व आमदार आमश्या पाडवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077